तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तक्रार अर्ज क्रं.०३/२०२६

श्री. सतेज महादेव दणाणे
मु.लोंढे-मोहितेवाडी, ता.माळशिरस,
जि.सोलापूर. } तक्रारदार

विरूध्द्

१. नामदेवराव सुर्यवंशी (बेडके) महाविद्यालय, फलटण
जि.सातारा

२. श्रीराम एज्युकेशन सोसायटी, फलटण,
जि.सातारा. } वि.प.

श्रीराम एज्युकेशन सोसायटी, फलटण, जि.सातारा या शिक्षण संस्थेचे नामदेवराव सुर्यवंशी (बेडके) महाविद्यालय, फलटण येथील सहा.प्राध्यापक श्री.सतेज महादेव दणाणे यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.०४/०३/२०२६ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये नमूद तक्रार पुढील प्रमाणे.

तक्रारीचे स्वरूप :

दि. २५ ऑक्टोंबर २०१३ च्या विद्यापीठ निवड समितीमार्फत नामदेवराव सूर्यवंशी (बेडके) महाविद्यालय, फलटण येथे मराठी विषयाच्या सहा. प्राध्यापकपदी निवड होवून मी पूर्णवेळ नियमित सेवेत आहे. माझ्या सर्व कागदपत्रांवर वडिलांचे नाव इंग्रजीमध्ये MAHADEO असे आहे. मात्र संस्थेकडून मला दिलेल्या नियुक्ती पत्रात माझ्या SATEJ MAHADEO DANANE या नावात वडिलांचे नाव MAHADEO ऐवजी MAHADEV (O ऐवजी V) असे लिहले आहे. हे नाव चुकीचे लिहिले आहे हे निदर्शनास आणून दिल्यानंतरही हजेरीपत्रक व ईपीएफ खात्यावरही असेच चुकीचे नाव लिहिले आहे. म्हणून मा. प्राचार्य व संस्थेला भेटून माझ्या नियुक्ती पत्रावर माझ्या वडिलांच्या नावात झालेली चूक दुरूस्त करण्याविषयी, हजेरीपत्रक, पीएफ खाते यावरील नावातील चूक दुरूस्त

करण्याविषयी वारंवार विनंती केली आहे. त्याचबरोबर दि. २३/०४/२२, दि.२७/०४/२२, दि.१०/१०/२२, दि.०७/११/२२, दि.१७/१२/२५, दि.०३/०१/२६, दि.०८/०१/२६, १७/०१/२६ रोजी पत्रे पाठवून लेखी विनंती केली आहे. तसेच दि.०६ एप्रिल २०२५ रोजी सातारा जिल्हा शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाने महाविद्यालयास भेट दिली. त्यावेळी सदर विषयावर चर्चा झाली. माझी मागणी योग्य व न्याय असल्याने संस्थेकडून व महाविद्यालयाकडून माझ्या नावात झालेली चूक दि. १५ जून २०२५ पर्यंत दुरूस्त करून देण्याचे आदेश मा. प्राचार्यांना सातारा जिल्हा शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाच्या अध्यक्षांनी दिले. तरीही हेतुपुरस्पर माझे नाव चुकीचे लिहिणे चालू ठेवले आहे. हयाच्या पडताळणीसाठी माझे नाव असणारे ओरिजनल (मूळ प्रत) हजेरीपत्रक महाविद्यालयाकडून सुनावणीच्या वेळी मागवून घ्यावे अशी मी विनंती करीत आहे.

माझे नाव हेतुपुरस्पर चुकीचे लिहिले आहे. त्या संदर्भात सातारा (श्री क्षेत्र माहुली) व कोल्हापूर ईपीएफ कार्यालय येथे ८- १० वेळा मला फे-या माराव्या लागल्या आहेत. शंभरपेक्षा अधिक वेळा मोबाईल वरून संपर्क करून व मेसेज करून विनंती केली आहे. कोल्हापूर ईपीएफ कार्यालयात मला सांगण्यात आले की, तुमचे संस्थेकडून e-sign हे २०२४ पासून केलेले नाही. त्यानंतर कोल्हापूर ईपीएफ कार्यालयातून असे सांगण्यात आले की, तुमची दोन ईपीएफ खाती आहेत. सदर बाबींचा पाठपुरावा केला असता असे आढळून आले की, माझ्या पहिल्या EPF खात्यात संस्थेमार्फत नामतात्र रक्कम भरली जात होती. ते खाते एप्रिल २०२४ मध्ये बंद करण्यात आले आहे व मे २०२४ मध्ये माझे नवीन खाते चालू करून त्यावर महाविद्यालयामार्फत नाममात्र रक्कम भरली जात आहे. मात्र e-sign केलेली नाही. हे मला कोल्हापूर कार्यालयात कॉम्प्युटरवर दाखविण्यात आले. तसेच माझ्या नावात संस्थेने केलेली चूक ही दुरूस्त केली नाही. संस्थेकडे चौकशी केली असता आमच्याकडून सर्व माहिती भरली आहे. आमच्याकडून काही बाकी नाही असे सांगण्यात आले. जाणीवपूर्वक मला अशा प्रकारे त्रास दिला जात आहे. या संदर्भाने मला आर्थिक खर्च व मानसिक त्रास झालेला आहे. त्यामुळे मला नुकसान भरपाई मिळावी अशी मी विनंती करीत आहे.

माझे नाव चुकीचे लिहिले व अनेक वेळा विनंती करून ही त्यामध्ये जाणीवपूर्वक दुरुस्ती केली नाही. या कारणास्तव मला झालेला त्रास व नाईलाजाने मला शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समितीकडे तक्रार दाखल करावी लागली आहे. या तक्रारी संबंधित होणारा सर्व खर्च मला संस्थेकडून दंडासह मिळावा व माझे नेमणूक पत्र, हजेरीपत्रक आणि ईपीएफ खाते व इतर सर्व ठिकाणच्या माझ्या नावातील चूक दुरूस्त करून वडिलांचे नाव MAHADEV ऐवजी MAHADEO (V ऐवजी O) असे करून देण्याविषयी आदेश देण्यात यावेत ही नम्र विनंती.

संस्था व महाविद्यालयाचे म्हणणे-

प्रस्तुत तक्रारींच्या अनुषंगाने परिनियम क्र. ३२८ नुसार तक्रारदार यांच्या तक्रार अर्जाच्या प्रती समितीकडे सादर करणेबाबत संस्था व महाविद्यालयास वारंवार कळविण्यात आले होते. त्यासाठी जाबदार संस्था व महाविद्यालय यांना वेळोवळी पत्रे व स्मरणपत्रे देण्यात आली होती. तसेच सुनावणीदरम्यानही लेखी म्हणणे सादर करण्याबाबतही समितीकडून निर्देश देण्यात आले होते. तथापि, संस्था व महाविद्यालयाने तक्रारीच्या गुणदोषांवर कोणतेही लेखी म्हणणे अथवा अभिप्राय समितीसमोर सादर केलेला नाही.

समितीची निरीक्षणे:-

प्रस्तुत प्रकरणी समितीने तक्रारदाराचा तक्रार अर्ज, त्यासोबत सादर केलेली कागदपत्रे, तसेच सुनावणीदरम्यान समितीसमोर आलेल्या बाबींचा काळजीपूर्वक विचार केला आहे.

तक्रार अर्जाच्या अवलोकनावरून असे निदर्शनास येते की, तक्रारदाराने त्यांच्या नावातील विसंगतीबाबत त्यांनी जाबदार संस्था व महाविद्यालयाकडे वेळोवेळी लेखी स्वरूपात दुरुस्तीची मागणी केली आहे. सदर मागणीच्या समर्थनार्थ तक्रारदार यांनी त्यांच्या शैक्षणिक अर्हतेची प्रमाणपत्रे, आधारकार्ड, पॅनकार्ड इत्यादी ओळखपत्रे, विद्यापीठाचे शिक्षक मान्यतापत्र तसेच नावातील दुरुस्तीबाबत संस्था व महाविद्यालयाकडे वेळोवेळी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती समितीसमोर सादर केल्या आहेत.

तक्रारदाराने सादर केलेल्या सदर कागदपत्रांचे अवलोकन करता, त्यांच्या अधिकृत कागदपत्रांमध्ये नमूद असलेल्या वडिलांच्या नावाच्या स्पेलिंगमध्ये आणि जाबदार संस्था व महाविद्यालयाने तक्रारदार यांना दिलेल्या दि.०३/०३/२०१४ रोजीच्या नियुक्ती आदेशातील स्पेलिंगमध्ये विसंगती असल्याचे समितीच्या निदर्शनास येते. तसेच, सदर विसंगती तक्रारदाराने जाबदार संस्था व महाविद्यालयाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतरही त्यामध्ये दुरुस्ती करण्यात आलेली नसल्याचे उपलब्ध पत्रव्यवहारावरून दिसून येते.

जाबदार संस्था व महाविद्यालयास सदर तक्रारीबाबत आपले म्हणणे, खुलासा अथवा संबंधित कागदपत्रे सादर करण्यासाठी पुरेशी व वाजवी संधी देण्यात आलेली होती. तथापि, तक्रारदाराने उपस्थित केलेल्या मुद्दयांचे खंडन करणारे कोणतेही ठोस कागदपत्रे अथवा लेखी स्पष्टीकरण जाबदार संस्था, महाविद्यालाकडून समितीसमोर सादर करण्यात आलेले नाही. तसेच, तक्रारदाराच्या नावातील सदर विसंगती दुरुस्त करण्याबाबत कोणती, तांत्रिक, प्रशासकीय अथवा कायदेशीर अडचण असल्याचेही जाबदारांकडून समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आलेले नाही.

त्यामुळे, समितीसमोरील उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे तक्रारदार यांच्या अधिकृत व प्रमाणित कागदपत्रांमध्ये नमूद असलेल्या नावाच्या नुसार नियुक्ती आदेश व संबंधित अभिलेखांमध्ये झालेली नावातील विसंगती दूर करण्याची तक्रारदाराची मागणी ही योग्य असल्याचे समितीचे मत आहे.

तथापि, तक्रारदार यांनी जाबदार यांचेकडून सदर नावाची चूक जाणीवपूर्वक अथवा हेतुपुरस्सर करण्यात आली असल्याचा आरोप अर्जात नमूद करण्यात आला आहे. मात्र, सदर आरोप सिद्ध करण्यासाठी आवश्यक असा कोणताही ठोस पुरावा त्यांनी समितीसमोर सादर केलेला नाही. त्यामुळे केवळ या आरोपाच्या आधारे जाबदार संस्था किंवा महाविद्यालयाने सदर चूक जाणीवपूर्वक केली आहे, असा निष्कर्ष नोंदविणे उचित ठरणार नाही.

मात्र, तक्रारदाराने नावातील विसंगती जाबदारांच्या निदर्शनास आणून देऊनही त्याच्या दुरुस्तीसाठी आवश्यक ती कार्यवाही दीर्घकाळ करण्यात आलेली नसल्याची बाब, उपलब्ध पत्रव्यवहार

व कागदपत्रांच्या आधारे समितीच्या निदर्शनास येते. सदर बाबीचे जाबदारांकडून कोणतेही समाधानकारक स्पष्टीकरण अथवा कारण समितीसमोर सादर करण्यात आलेले नाही.

तक्रारदार यांनी त्यांच्या EPF खात्याशी संबंधित नोंदींमध्येही नावातील विसंगती असल्याचे तसेच EPF खात्याच्या संदर्भात काही अडचणी निर्माण झाल्याचे तक्रारीत नमूद केले आहे. सदर बाबीच्या अनुषंगाने तक्रारदाराने संबंधित EPF कार्यालयाशी केलेल्या पाठपुराव्याचा उल्लेखही तक्रारीत नमूद केला आहे.

यासंदर्भात समितीचे मत असे आहे की, तक्रारदाराच्या अधिकृत कागदपत्रांतील योग्य नावाच्या आधारे संबंधित EPF प्राधिकरणाकडे आवश्यक ती दुरुस्ती प्रक्रिया/प्रस्ताव याबाबतची कार्यवाही सुरू करणे, आवश्यक कागदपत्रे सादर करणे व त्याबाबतचा पाठपुरावा करणे ही नियुक्ती प्राधिकारी म्हणून, जाबदार संस्था/महाविद्यालयाची जबाबदारी असून त्याबाबतची कार्यवाही त्यांचेकडून होणे अपेक्षित आहे.

तक्रारदार यांनी नावातील विसंगतीमुळे झालेल्या आर्थिक खर्च, मानसिक त्रास तसेच तक्रार निवारण समितीकडे तक्रार दाखल करण्यासाठी झालेला खर्च यापोटी नुकसानभरपाई व दंडाची मागणी केली आहे.

या मागणीबाबत समितीचे मत असे की, तक्रारदारास नुकसानभरपाई अथवा दंडात्मक स्वरूपाची रक्कम मंजूर करण्याची मागणी या समितीच्या अधिकारक्षेत्रात येत नसल्याने ती मागणी समितीस विचारात घेता येत नाही.

वरील सर्व बाबी, उपलब्ध कागदपत्रे तसेच जाबदार संस्था व महाविद्यालयास दिलेली संधी यांचा एकत्रित विचार करता, तक्रारदाराच्या नियुक्ती आदेशासह संबंधित कार्यालयीन कागदपत्रांमध्ये त्यांच्या वडिलांच्या नावाच्या स्पेलिंगमध्ये झालेली विसंगती दूर करून तक्रारदार यांच्या अधिकृत व प्रमाणित कागदपत्रांप्रमाणे योग्य नोंद करणे आवश्यक असल्याचे समितीचे स्पष्ट मत आहे. करिता समिती खालील आदेश पारित करित आहे.

आदेश

१. तक्रार अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. जाबदार श्रीराम एज्युकेशन सोसायटी, फलटण व नामदेवराव सूर्यवंशी (बेडके) महाविद्यालय, फलटण यांनी तक्रारदार श्री. सतेज महादेव दणाणे यांच्या नियुक्ती आदेशामध्ये तसेच हजेरीपत्रक, सेवा अभिलेख व इतर संबधित कार्यालयीन नोंदींमध्ये, तक्रारदाराने सादर केलेल्या अधिकृत व प्रमाणित कागदपत्रांतील योग्य नावाच्या आधारे, त्यांच्या वडीलांच्या नावाच्या स्पेलिंगमधील विसंगती दुरूस्त करून आवश्यक ती नोंद करावी. सदर दुरूस्ती करताना संबधित कागदपत्रांच्या मूळ स्वरूपास बाधा येणार नाही अशा पध्दतीने नियमानुसार प्रमाणित नोंद करण्यात यावी.

३. तक्रारदार यांच्या EPF खात्यातील नावामध्येही विसंगती असल्यास, जाबदार संस्था/महाविद्यालयाने तक्रारदाराच्या अधिकृत कागदपत्रांनुसार योग्य नावाची नोंद करण्यासाठी संबंधित EPF प्राधिकरणाकडे आवश्यक ती दुरुस्ती प्रक्रिया/प्रस्ताव याबाबतची कार्यवाही तात्काळ सुरू करावी व त्याचा आवश्यक पाठपुरावा करावा.

४. वरील सर्व कार्यवाही हा आदेश प्राप्त झाल्यापासून एक (०१) महिन्याच्या आत पूर्ण करण्यात यावी.

५. तक्रारदार यांनी अर्जात नमूद केलेल्या आर्थिक नुकसानभरपाई, दंडात्मक रक्कम तसेच तक्रारीशी संबंधित खर्चाची भरपाई देण्याची मागणी नामंजूर करण्यात येत आहे.

दिनांक : 20 AUG 2026

शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

सदस्य
(श्रीमती ए.एच.कोलेकर)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.पी.हंगिरगेकर)

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(श्री.एस.यु.शिंदे)

सदस्य
(प्रा.डॉ.ए.बी.साळी)

अध्यक्ष
(श्री.एस.एन.पाटील)